
ज्ञानज्योती
सावित्रीबाई फुले
डॉ. उषा पोळ - खंदारे
- एम.ए., एम.एड., पी.एच.डी.

# अनुक्रमणिका


- एकोणिसाव्या शतकातील स्त्री जीवन ........................ १
- सावित्रीबाईंचे बालपण आणि विवाह ........................ १५
- आदर्श वैवाहिक जीवन ........................ २४
- पहिली भारतीय थोर शिक्षिका ........................ ४५
- सावित्रीबाईंचे शिक्षणातील क्रांतिकार्य ........................ ६४
- स्त्री मुक्ती आंदोलनाचा आत्मस्वर ........................ ८०
- सामाजिक क्रांतीच्या प्रणेत्या ........................ ९०
- सावित्रीबाईंच्या काव्यफुलांचा सुगंध ........................ १०३
- सावित्रीबाईंचे विविध पैलू ........................ ११४
- सावित्रीबाईंचे विचारधन ........................ १२८
- जोतीरावांच्या ज्योतीचे महानिर्वाण ........................ १४०
- मान्यवरांची भावांजली ........................ १५४
- महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाच्या योजना ........................ १६१
- महाराष्ट्रातील संस्था ........................ १६६

# अंतरंग

'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले' यांचे चरित्र लिहित असताना विविध पुस्तकांचे वाचन झाले. त्यावेळी 'महात्मा फुले साहित्य आणि चळवळ' संपादक - हरी नरके या पुस्तकातील पुढील मजकूर वाचला आणि साऱ्या संवेदनाच गोठून गेल्या. तो मजकूर असा -' सावित्रीबाई १८४८ ते १८९७ अशी सलग ५० वर्षे लोकांसाठी राबत होत्या. त्यांच्यानंतर एकाकी डॉ. यशवंत सैरभर झाले. हाँगकाँग, आफ्रिका, चीन येथे त्यांनी लष्करात नोकरी केली. दि. १३ ऑक्टोबर १९०६ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांची पत्नी चंद्रभागा आणि मुलगी सोनी उर्फ लक्ष्मी यांच्या अनाथपणाला पारावार राहिला नाही. त्यांनी सर्वप्रथम जोतीरावांची सगळी पुस्तके रद्दीत विकली. त्यानंतर भांडीकुंडी विकून गुजराण केली आणि शेवटी दि. २८ ऑक्टोबर १९१० रोजी जोतीराव सावित्रीबाईंचे ऐतिहासिक घर त्यांनी अवघ्या शंभर रूपयांना मारुती कृष्णाजी वेडगे यांना विकले. बाई-मुलींसह रस्त्यावर आल्या. बेवारस म्हणून रामेश्वराच्या दारात वारल्या. त्यांची अंत्ययात्रा बेवारस म्हणून नगर पालिकेने केली.

थोर महात्मा, क्रांतीचे प्रणेते, स्त्री शिक्षणाचे जनक, समाजसुधारक जोतीराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या वारसदारांची ही शोकांतिका ! ज्यांनी संपूर्ण आयुष्य समाजासाठी व्यतीत केलं. समाजापुढे उत्तुंग असा आदर्श निर्माण केला. त्यांचे घर देखील विकले जावे यासारखं दुर्दैवं ते कोणतं ? या मजकुरानं मन पुन्हा पुन्हा बेचैन होतं.

# प्रस्तावना

काही थोर व्यक्ती जन्माला येतात आणि मुळातच असलेल्या अलौकिक गुणांनी साऱ्या समाजालाही मोठेपणा प्राप्त करून देतात. सावित्रीबाईही अशाच थोर होत्या.

एकोणिसाव्या शतकात अंधश्रद्धेने आणि अज्ञानाने निश्चेष्ट समाजाला ज्ञानसूर्याचा प्रकाश दाखविणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई जनकल्याणाच्या मार्गावर अपमानाचे कांटे दूर करीत न डगमगता खंबीरपणे अखेरपर्यंत चालत राहिल्या.

भारतातील पहिली शिक्षिका / मुख्याध्यापिका, सामाजिक क्रांतीच्या प्रणेत्या, स्त्री मुक्ती आंदोलनाची युगकर्ती आणि जातीभेदास जबरदस्त विरोध करणारी पहिली थोर कार्यकर्ती !

महात्मा जोतीराव फुले यांनी आपल्या दिव्य ज्ञानाच्या ज्योतीने प्रज्वलित केलेली एक तेजस्वी ज्योत ! जी स्वयंप्रकाशित झाली. स्वयंप्रकाशाने तळपत असतांनाच त्या क्रांतिज्वालेनं स्त्रियांना, वंचितांना, दीन-दुबळ्यांना इतकंच नाही तर साऱ्या समाजालाच प्रकाशमय केलं.

प्रखर बुद्धिमत्ता आणि बाणा घेऊन आलेल्या सावित्रीबाईंची जीवनगाथा म्हणजे एक धगधगतं अग्निकुंडच ! जे निष्काम सेवेनं सतत कार्यरत होतं.

स्वतःच्या कार्यावरील अढळ निष्ठा, विद्येचा व्यासंग, विलक्षण चिकाटी, सामाजिक क्रांतीची दूरदृष्टी, कठोर तत्त्वनिष्ठा आणि मानवतेच्या कैवारी अशा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंमुळे त्यांच्या जीवनचरित्रास तेजोवलय प्राप्त झालं आहे.

पूर्वीच्या काळी केशवपन, सतीची चाल, बालहत्या, भ्रूणहत्या, अंधश्रद्धा अशा अनिष्ट प्रथांनी समाजाला ग्रासले होते. स्त्रीचं दुःख पराकोटीला पोहचलं की, स्वतःचा जीव देऊन ती मोकळी व्हायची. कारण तिच्या छळांना कोणती सीमाच नव्हती. गुलामीचे जीवनच तिला जगायला लागे.

२१ व्या शतकात देवदासी, अंधश्रद्धा, बालविवाह, हुंडाबळी, स्त्री-भ्रूणहत्या, घरगुती हिंसाचार, लैगिंक शोषण अशा अनिष्ट गोष्टींनी वेगळे

रूप धारण केले आहे. ती स्वतः जीव द्यायच्या अगोदरच पती वा घरातीलच मंडळी तिच्या जिवावर उठतात. पूर्वी अशा घटना समाजातील एखाद्या घटकापुरत्याच मर्यादित असत. आता मात्र त्याच लोण मध्यमवर्गीय आणि उच्चभ्रू वर्गातही पसरलं आहे.

आत्महत्या करीत असताना, शरीर आणि मन जळत असताना काही महिलांचा जीव वाचतोही पण त्यानंतर सुरु होते त्यांची खरी लढाई! कारण त्यांच्या जखमा भरल्या तरी दुसरं दुःख त्यांच्यापुढे उभं राहतं. शरीर जळल्यामुळे त्याचा वास तिच्या श्वासातच असतो. तर शरीर कुरूप झालं म्हणून नवरा सोडून जातो. जीवनाची दुर्दशा मात्र पाठलाग करते ती शेवटपर्यंत!

दीडशे वर्षांपूर्वी सावित्रीबाईंनी ज्ञानाचा दिवा लावून स्त्रीच्या जीवनात प्रकाश आणला. आज मागे वळून पाहताना इतक्या वर्षांनंतरही तिची अवहेलना संपलेली नाही. आजच्या काळातही हुंड्याची मागणी करणे, धमकी देणे, महिलेला मूल होत नसल्यास पतीने दुसरा विवाह करणे, केवळ मुलीच होतात म्हणून स्त्रीला दोषी मानून तिची सतत मानहानी करणे, तिला नातेवाईकांपासून, मित्र-मैत्रिणी यापासून दूर ठेवणे, तिच्या चारित्र्याविषयी संशय घेणे, स्त्रीला नोकरी करण्यास प्रतिबंध करणे, तिची मालमत्ता, दागिने तिच्या परवानगीशिवाय विकणे, तिने कमविलेले पैसे तिच्या हातात न देणे, पैसे खर्च करण्याची तिला परवानगी न देणे अशा घटना तर नित्यच घरोघरी घडताना दिसतात. शिक्षणाने मनुष्य सुशिक्षित झाला. पण तो सुसंस्कृत झाला काय? हा प्रश्न आहे.

आपल्याकडे केवळ अशिक्षित किंवा खेड्यामधील महिलांवर अत्याचार होतात असं नाही तर शहरी आणि सुशिक्षितांच्या घरीही महिलांवरील अत्याचाराचं प्रमाण खूप जास्त आहे. आर्थिकदृष्ट्या पतीवर अवलंबून असणाऱ्या स्त्रियांना तसंच पूर्णपणे स्वावलंबी असणाऱ्या स्त्रियांनाही छळाला सामोरं जावं लागतं.

आजही तळागाळातील स्त्रियांचं आयुष्य अपार कष्ट करण्यात जातं. डपिंग ग्राऊंडवर काम करणाऱ्या बायका कचरा गोळा करणाऱ्या, भांडी-धुणी घरकाम करणाऱ्या, रस्त्यावर झाडणाऱ्या, शेतात बांधकामाच्या

ठिकाणी मोलमजुरी करणाऱ्या, रात्रंदिवस विड्या वळणाऱ्या, खाणीत, रस्त्यावर काम करणाऱ्या असंख्य स्त्रिया आपण पाहतो. त्यांचं कुपोषण, बालविवाह, बाळंतपणातील मृत्यू, त्यांना होत असलेली मारहाण, त्यांच्यावरील अन्याय हा संपलेला नाही. २१ व्या शतकात वाटचाल करीत असताना दारिद्र्य रेषेखालील जगणाऱ्यांची संख्या आणि कुपोषणाने बळी जाणाऱ्यांची संख्या ही वाढते आहे. लाखो मुलं शिक्षणापासून वंचित आहेत. मग आपण देशाचा विकास, शैक्षणिक प्रगती केली असं म्हणायचं का ?

अजूनही ग्रामीण भागात भूमिहीन शेतमजूर म्हणून काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या मोठी आहे. त्यांचं सारं आयुष्य कुटुंबाचं पालन पोषण करण्यात खर्च होतं. अजूनही घरात इंधन म्हणून जळणासाठी लाकडं आणायला जंगलात दूर पायपीट करावी लागते. प्यायला पाणी मिळत नाही. पाणी आणण्यासाठी तीन तीन ! चार चार मैल अनवाणी खाचखळग्यांचा रस्ता तुडवावा लागतो.

विवाहानंतर संसार फुलू लागत असतानाच मोडण्याचे प्रमाण वाढत असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे ८०% टक्के जोडप्यांचे विवाह घरच्यांच्या संमतीने होत असूनही हे चित्र आहे. आपल्या जोडीदारापासून विभक्त होण्यासाठी कोर्टात दावे दाखल करणाऱ्या जोडप्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. मुलांच्या बरोबरीने मुलीही आता कमावत्या झाल्या असून त्यांनाही स्वतंत्र विचार असू शकतात याची जाणीवच समाजाला झालेली नाही. हे बदललेलं सामाजिक वास्तव पचवणं अनेकांना शक्य झालेलं नसल्यानं लग्न मोडण्यास या कारणाबरोबरच एकत्र कुटुंबातून निर्माण होणाऱ्या समस्या, शारीरिक त्रास, घरच्याच्या विरोधात जाऊन केलेलं लग्न, हुंड्याची मागणी, एकमेकांकडून बाळगलेल्या अवास्तव अपेक्षा ही कारणे देखील यास कारणीभूत आहेत.

परित्यक्त्यांची संख्या वाढते आहे. आई आणि बाप या दोन्ही भूमिका तिला पार पाडाव्या लागत आहेत. वीस-वीस तास काम करूनही अनेक स्त्रिया कुपोषणाच्या बळी ठरत आहेत. तर दुसरीकडे श्रीमंत आणि उच्चभ्रू स्त्रियांच्या समस्या वेगळ्या आहेत. त्यांनाही बंदिस्त जीवन जगावे लागते.

आज स्त्रिया शिकल्या अर्थाजन करू लागल्या तरी त्यांच्या घरातील

परिस्थिती मात्र बदललेली नाही. समाज व्यवस्थेची वैचारिक घडी जशीच्या तशीच आहे. त्यात फारसा बदल झालेला नाही.

वर्तमानपत्रांत रोजच बलात्काराच्या आणि स्त्रियांच्या छळाच्या घटना वाचायला मिळतात. यामध्ये दिवसेंदिवस भरच पडत आहे. मग कितीही कायदे करा. त्याचं मोल शून्य ठरतं. वाढत चाललेली अमानुषता, कुस्करल्या जाणाऱ्या कोवळ्या कळ्या, निर्घृण हत्याकांड ! सारच कसं संवेदना गोठून टाकणारं !

घरगुती छळ, हुंडाबळी, महिलांची आत्महत्या या घटना तर होतच आहेत. याशिवाय कोठेवाडी घटना, भूकंपातील स्त्रियांचे हाल, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील स्त्रियांची अवस्था तर फारच केविलवाणी ! एका गावात तर स्त्रीला गावदासीच बनवलं गेल. सर्वांनाच लाज वाटावी असं हे समाजाचं वास्तव !

महिलांची होत असलेली विटंबना, त्यांची विवस्त्र धिंड काढणे, यावर कळस म्हणजे तिला ठार मारून, तिचे तुकडे करून फेकून देणे. जेसिका काय किंवा रूचिका काय या समाजव्यवस्थेच्या दलदलीत बळी जातात त्या केवळ स्त्रिया ! अशा अनेक स्त्रियांची करुण कहाणी कुणालाही न समजलेली जी फक्त तिलाच माहीत असलेली ! कधी संपणार हे सगळं ? आणखी किती वर्ष वाट पाहायची ! इंडिया शायनिंग ! आज आपण जरी म्हणत असलो तरी स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा प्रकाश खरोखरच पसरला आहे का ? आजच्या काळातील निर्माण झालेले असे नवीन असंख्य प्रश्न !

सध्याच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात संस्कृती आणि परंपरा या नावाखाली अनिष्ट प्रथाचं उदात्तीकरण दूरदर्शनवरील विविध मालिकांतून चालू असतं. बालिका वधू सारख्या मालिका बालविवाहास अकारण प्रसिद्धीच वलय प्राप्त करून देतात. एकोणिसाव्या शतकात महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी बालविवाहास प्रतिबंध केला होता. ही प्रथा मोडून काढण्यात त्यांना थोडंफार यशही मिळालं होतं. त्यांनी दिलेला लढा फोल ठरतो की काय अशी भीती वाटू लागते. या काळात जर आपण बालविवाहाचे पुरस्कर्ते झालो तर 'पुरोगामी विचारांचे आपण' हे बिरूद स्वतःला लावायचं का ?

शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना सकस व पोषक आहार मिळावा, ग्रामीण दुर्गम भागातील लहान बालकांनी कुपोषणापासून मुक्त व्हावं यासाठी सरकारने शालेय पोषण आहार ही योजना लागू केली. परंतु त्यामागील उदात्त भावना मागे पडून आज या योजनेला धंद्याचे स्वरूप आले आहे. छोट्या मुलांच्या तोंडचा घासही आता पळवला जाऊ लागला आहे. गरीब मुलांच्या पोषणाऐवजी ठेकेदारांचे किसे भरले जाऊ लागले. या निष्पाप मुलांचा या योजनेशी काहीही संबंध नसतो. महात्मा फुले आणि सावित्रीबाईंनी स्वतः उपाशी राहून दरिद्री अवस्थेत जगून समाजातील गरीब मुलांचे पालन-पोषण केले. शाळेत आलेल्या बालहत्या प्रतिबंधक गृहातील मुलांना खाऊ-पिऊ घातले. त्यांच्या या निरपेक्ष समाजसेवेचे मोल आज अधिक जाणवते. त्यांनी केलेलं कार्य कवडीमोल तर ठरणार नाही नां ? अशी भीती वाटू लागते.

दारिद्र्यरेषेखाली जगणारे लोक, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कुपोषणाचे बळी, देशावर झालेले डोंगराएवढे कर्ज या सर्व घटना मनाला विषण्ण करीत असतात. १८७७ मध्ये महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला तेव्हा जोतीराव आणि सावित्रीबाई सर्वांच्याच मदतीला धावून गेले. त्यांनी गावोगाव फिरून निधी जमविला. व्हिक्टोरिया बालाश्रम सुरु करून त्याठिकाणी दररोज एक हजार गोरगरीब मुलांना जेवण घातले जाई. सावित्रीबाई आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने स्वतः हा स्वयंपाक करीत. त्यांचा हा वारसा पुढे चालायला हवा !

सगळचं चित्र काळकुट्टं नाही. थोडं आशादायक पण आहे. सावित्रीबाईंनी दाखविलेल्या मार्गावरून त्यांच्या हजारो लेकी चालत आहेत. त्यातील काही यशाच्या शिखरावर पोहचत आहेत. त्याचं प्रमाण मात्र अल्प असं आहे. तरीसुद्धा अजून बराच पल्ला गाठायचा आहे. या संघर्षात का होईना पण त्यांच्या विचारांचं पंखांत बळ आहे आणि म्हणूनच आकाशात उंच भरारी घ्यायची आहे.

'दगड, शेण मारणारे छोटे असतात. पण हे दगड ज्यांच्यावर बसतात त्या व्यक्ती मात्र समाजात महान ठरतात !' 'कुणी काही म्हणू दे. मी माझ्या कार्यावर निष्ठा ठेवीन.' एवढं जरी स्वतः त्या स्त्रीनं ठरवलं

तरी आपण सावित्रीबाईंच्या कार्याची एक पाकळी घेतली असं म्हणता येईल.

३ जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिवस शाळेत नेहमीच साजरा केला जात असतो. त्यावेळी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू उलगडून दाखविले जातात. हे करीत असताना त्यांचे जीवन चरित्र लिहिण्याची प्रेरणा मिळाली. या प्रेरणेतून मनातलं एक संकल्प या पुस्तकाच्या रूपाने पूर्ण झाला आणि मनातून गदगदणं कमी झालं.

या चरित्र लेखनाच्या निमित्ताने मी सावित्रीबाईंच्या जन्मगावी म्हणजे नायगावला भेट दिली. त्यावेळी मी खूप भारावून गेले. नायगाव गावच्या वेशीवरच प्रवेशद्वारावर सावित्रीबाईंची ओळख करून दिली आहे. हे प्रवेशद्वार मुंबई सातारा या हायवेवरच असल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांना ते सहजपणे दिसते. त्यामुळे हात आपोआपच जोडले जातात.

त्यांच्या जन्म घरी शासनाने त्यांचे स्मारक केले आहे. जुना पडका वाडा पूर्वी कसा होता त्याचे छायाचित्र त्या घरांतील आत लावलेले असल्यामुळे पूर्वी कशी स्थिती होती हे समजते. शासनाने त्या ठिकाणी नव्याने घर बांधून आजूबाजूला थोडेसे पानांफुलांनी सुशोभित केले आहे.

गावा मध्ये ठिकठिकाणी सावित्रीबाईंच्या काव्यातील काव्य पंक्ती लिहिल्या आहेत. सावित्रीबाईंची होत असलेली नित्य आठवण आणि काव्यांतून होत असलेले मूल्यांचे संस्कार यामुळे गावकऱ्यांसमोर आणि नवीन पिढीसमोर आदर्श निर्माण होण्यास मदत झाली आहे. प्रत्येक वर्षी तीन जानेवारीला त्यांच्या जन्म दिनी या ठिकाणी शासन आणि स्थानिक लोकांतर्फे एक मोठा कार्यक्रम आयोजित केला जातो.

सध्या नायगाव मध्ये प्राथमिक, माध्यमिक शाळेप्रमाणेच मुलींच्यासाठी एक डी.एड. कॉलेज आहे. गावात प्रवेश केल्यानंतर मी मनिषा नेवसे या १२ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीची भेट घेतली. तिने गावातील बरीचशी माहिती सांगितली. सध्या मुली शिक्षणासाठी दूरवर जातात. आपले शिक्षण पूर्ण करतात. विशेष म्हणजे मुली शिक्षण घेत असताना घरातील शेतीचीही कामं करतात. हे ऐकून तर खूपच आश्चर्य वाटलं. एकूण काय आजच्या काळात सावित्रीबाईंचा हा वारसा या तरुण

लेकी समर्थपणे पुढे चालवत आहेत असे दिसले.

क्रांती देवता सावित्रीबाईंच्या जन्मगावी नायगाव येथे शासनाने छोटेसे स्मारक उभे केले आहे. परंतु त्या ठिकाणी भेट दिल्यानंतर काही गोष्टींची उणीव मात्र भासते. त्याचठिकाणी वा वरच्या बाजूला नवीन खोल्या बांधून एक वाचनालय असायला हवं. त्यांनी लिहिलेली पुस्तके, संपादित केलेली पुस्तके, त्यांच्यावर निर्माण झालेलं साहित्य यांची सुंदर मांडणी तिथं करावयास हवी. म्हणजे भेट देणाऱ्या व्यक्तींना ही पहायला मिळतील.

महात्मा जोतीराव फुले व क्रांतीदेवता सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित अनेक पुस्तके शासनातर्फे व खाजगी प्रकाशकांतर्फे प्रकाशित झाली आहेत. ती सर्व पुस्तके तिथं ठेवणं आवश्यक वाटतं. महात्मा जोतीराव फुले यांच्या चरित्रावर आधारित माहितीपर, बोधपट, चित्रपट निर्माण झालेले आहेत. ते ही त्याठिकाणी दाखविण्याची सोय व्हायला हवी.

जगप्रसिद्ध साहित्यिक शेक्सपियर यांच्या जन्मगावी म्हणजे स्ट्रॅटफोर्डला मी जेव्हा भेट दिली तेव्हा त्यांनी निर्माण केलेलं साहित्य, त्यांच जीवन, बालपण, कौटुंबिक जीवन या सर्व गोष्टी जपून तर ठेवलेल्या दिसल्या. त्यांच्या नाटकांचं होत असलेलं सतत प्रक्षेपण प्रवाशांना एक सुखद अनुभव देत असतो. जी जी व्यक्त भेट देते त्यांचे हात आपोआपच आदरानं जोडले जातात. तो एका महान साहित्यिकाला मानाचा मुजरा असतो.

ज्ञानज्योती सावित्रीबाईंच्या जन्मस्थळी भेट दिल्यानंतर मला स्ट्रॅटफोर्ड या भेटीची आठवण झाली आणि फरकही जाणवला.

ज्ञानज्योती सावित्रीबाईंच कार्य साऱ्या देशालाच प्रेरणादायी ठरलं आहे. म्हणूनच त्यांच्या जन्मस्थळी त्यांच्या वरील निर्माण झालेल साहित्य तिथं उपलब्ध असावं. त्यापासून प्रत्येकालाच प्रेरणा मिळेल असं मनापासून वाटतं.

खंडोजी नेवसे पाटील यांची सहावी पिढी श्री. सुधीर मुरलीधर नेवसे - पाटील यांची भेट झाली. त्यांच्याशी सुसंवाद झाल्यानंतर बऱ्याच गोष्टी समजल्या ते ही स्वतः बी.एस.सी. आहेत. वडिलोपार्जित शेतीचे काम

स्वतः करतात. एवढ्या छोट्याशा खेड्यात जन्मलेल्या सावित्रीबाई साऱ्या देशाच्या !

सावित्रीबाईंच्या जन्मगावी भेट देण्यासाठी श्री. विनय शिंदे आणि डॉ. विनंती शिंदे यांनी मोलाचे सहकार्य केले. त्याबद्दल त्यांचे विशेष आभार. श्रीम. शीला राजाध्यक्ष, मुख्याध्यापिका आई.इ.एस. माध्यमिक शाळा, भांडूप आणि याच शाळेच्या ग्रंथपाल श्रीम. संघमित्रा मोरे यांचे सहकार्य मला संदर्भ ग्रंथांसाठी मिळाले त्यांचे मनापासून आभार.

श्रीम. कांचन शेट्ये यांनी केलेल्या आग्रहामुळे सावित्रीबाईंचे हे चरित्र पूर्ण झाले. श्री. गुरुनाथ शेट्ये आणि श्रीमती कांचन शेट्ये यांचे मनःपूर्वक आभार. श्री. विजय केदारे, श्री. विकास साटम यांचे संदर्भग्रंथ, इंटरनेटवरील यांच्या बाबतीत नेहमीच सहकार्य मिळत असते. त्यांचे विशेष आभार. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे सुंदर मुखपृष्ठ श्री. चंद्रशेखर बेगमपुरे यांनी काढून दिले त्यांचे मनापासून आभार. कु. सोनल कुंभार यांनीही मोलाचे सहकार्य केले आहे त्यांचेही आभार.

या पुस्तकाच्या रूपाने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मगावी भेट दिली हा माझ्या जीवनातील एक अनमोल ठेवा याच वर्णन शब्दात न मावणारं ! त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन अनेक तेजस्विनी स्वसामर्थ्यानं कर्तृत्वाच्या नभांगणात मुक्तपणे संचार करतील असा विश्वास वाटतो.

***- डॉ. उषा पोळ - खंदारे***

काही थोर व्यक्ती जन्माला येतात आणि मुळातच असलेल्या अलौकिक गुणांनी साऱ्या समाजालाही मोठेपणा प्राप्त करून देतात. सावित्रीबाईही अशाच थोर होत्या.

एकोणिसाव्या शतकात अंधश्रद्धेने आणि अज्ञानाने निश्चेष्ट समाजाला ज्ञानसूर्याचा प्रकाश दाखविणारी क्रांतिज्योती सावित्रीबाई जनकल्याणाच्या मार्गावर अपमानाचे काटे दूर करीत न डगमगता खंबीरपणे अखेरपर्यंत चालत राहिल्या.

भारतातील पहिली शिक्षिका / मुख्याध्यापिका सामाजिक क्रांतीच्या प्रणेत्या, स्त्री मुक्ती आंदोलनाची युगकर्ती आणि जातीभेदास जबरदस्त विरोध करणारी पहिली थोर कार्यकर्ती !

महात्मा जोतीराव फुले यांनी आपल्या दिव्य ज्ञानाच्या ज्योतीने प्रज्वलित केलेली एक तेजस्वी ज्योत ! जी स्वयंप्रकाशित झाली आणि स्वयंप्रकाशाने तळपत असतानाच त्या क्रांतिज्वालेने स्त्रियांना, वंचितांना, दीन-दुबळ्यांना इतकंच नाही तर साऱ्या समाजालाच प्रकाशमय केलं.

प्रखर बुद्धिमत्ता आणि करारी बाणा घेऊन आलेल्या सावित्रीबाईंची जीवनगाथा म्हणजे एक धगधगतं अग्निकुंडच ! जे निष्काम सेवेनं सतत कार्यरत राहिलं.

स्वतःच्या कार्यावरील अढळ निष्ठा, विद्येचा व्यासंग, विलक्षण चिकाटी, सामाजिक क्रांतीची दूरदृष्टी, कठोर तत्त्वनिष्ठा आणि मानवतेच्या कैवारी अशा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंमुळे त्यांच्या जीवनचरित्रास तेजोवलय प्राप्त झाले आहे.

सावित्रीबाई म्हणजे साक्षात स्त्री मुक्तीच्या आंदोलनाचा आत्मस्वर ! ही मुक्ती म्हणजे अन्याय, अत्याचार याविरुद्धचा लढा ! हा लढा त्यांनी अखेरपर्यंत दिला. आज इतक्या वर्षानंतरही स्त्रियांच्यावर होत असलेले अन्याय संपलेले नाहीत. तिची होत असलेली विटंबना, हुंडाबळी, स्त्री-हत्याकांड, स्त्री-भ्रूणहत्या, देवदासी प्रथा, वाढत असलेली अमानुषता या सर्व घटना काय सांगतात ? आधुनिक काळातही समाज व्यवस्थेची वैचारिक मानसिकता बदलली का ? कुठवर तिनं प्रतिक्षा करायची ? म्हणूनच सावित्रीबाई फुलेंच्या कार्याचं मोल अधिक जाणवतं.



**डॉ. उषा पोळ - खंदारे**
- एम.ए., एम.एड., पी.एच.डी.

कोमल प्रकाशन